**संतगाडगे बाबा अमरावतीविद्यापीठ**
**परिपत्रकक्रमांक १०२/२०२०**

**विषय - सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन आणि शैक्षणिक वेळापत्रकाबाबत (राज्य शासनाद्वारे प्राप्तनिर्देश)**

संदर्भ— यएनआय/२०२०/बैठक/विशि-१/४१३१/ए, दिनांक ८ मे, २०२०

कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व त्यानुसार झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकांचे नियोजन करण्याकरीता राज्य शासनाने समिती गठित केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारसी शासनाने स्विकृत केल्याचे व त्या शिफारसीच्या अनुषंगाने विद्यापीठांनी आवश्यक कार्यवाही करुन अधिनस्त महाविद्यालयांना कळविण्याचे संदर्भीय पत्राद्वारे सूचित केलेले आहे.

त्यास अनुसरुन प्रस्तृत शिफारसी विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकारीणी समोर सादर करण्यात येतील. तथापि, महाविद्यालये, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मनात कोणताही संभ्रम राहू नये, व त्यांना सदर बाबींची प्राथमिक माहिती अवगत व्हावी, या हेतूने खालीलप्रमाणे ठळक बाबी माहितीकरीता कळविण्यात येत आहे.

१) अंतिम वर्षामध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांना अंतिम सत्राची परीक्षाद्यावयाची आहे. जसे-
   अ) दोन वर्षीय अभ्यासक्रमांमध्येचवथ्या सत्राचेविद्यार्थी व चवथ्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र १, २ व ३ मधील बॅकलॉगचे विषय असतील, अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
   ब) तीन वर्षीय अभ्यासक्रमामध्ये सहाव्या सत्राचेविद्यार्थी व सहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ३, ४ व ५ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
   क) चार वर्षीय अभ्यासक्रमामध्ये आठव्या सत्राचेविद्यार्थी व आठव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ५, ६ व ७ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
   ड) पाच वर्षीय अभ्यासक्रमामध्ये दहाव्या सत्राचेविद्यार्थी व दहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ७, ८ व ९ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.

२) सत्र ४, ६, ८ व १० या अंतिम सत्रातील परीक्षेच्या प्रश्नपत्रिका दिनांक १३ मार्च, २०२० पर्यंत म्हणजेच दोन तृतियांश अभ्यासक्रमांवर राहील व अशा प्रश्नपत्रिकांची वेळ दोन तासांची राहील, तसेच ज्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांना बॅकलॉगचे विषय आहेत, अशा विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालयाने पूर्ण अभ्यासक्रमांवर ५० टक्के गुणमूल्य आधारावर दोन तासांच्या प्रश्नपत्रिका तयार कराव्यात, व ५० टक्के गुणांचे १०० टक्क्यांमध्ये रुपांतर करुन विद्यापीठाला परीक्षेनिहाय, सत्रनिहाय व विषयनिहाय प्राप्त झालेले गुण पाठवावे. (प्रश्नपत्रिका विद्यापीठाद्वारे किंवा महाविद्यालयाद्वारे पुरविण्याबाबत अंतिम निर्णय सक्षम प्राधिकारीणीचा राहील.)

३) उपरोक्त प्रमाणे घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी सर्व महाविद्यालये ही परीक्षा केंद्र म्हणुन राहतील. व सत्रनिहाय प्रवेशित विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन हे महाविद्यालयीन स्तरावरच होईल, आणि अशा उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन प्रक्रिया आटोपल्यानंतर परीक्षेनिहाय व सत्रनिहाय प्रवेशित विषयामध्ये प्राप्त झालेले गुण महाविद्यालयाद्वारे विद्यापीठाकडे पाठविण्यात येतील.

४) अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक / प्रकल्प परीक्षा व याच विद्यार्थ्यांना जर जून्या सत्राचे प्रात्यक्षिक, प्रकल्प इत्यादी बॅकलॉग असतील अशा सर्व परीक्षा त्या त्या महाविद्यालयांत परिस्थितीनुरुप अंतर्गत व बाह्य परीक्षक त्याच महाविद्यालयाचा म्हणुन नेमून प्रात्यक्षिक / प्रकल्प परीक्षांचे संचालन करतील, किंवा उपरोक्तप्रमाणे शक्य नसल्यास या परीक्षा शासनपत्र संकिर्ण-२०२०/प्र.क्र.१२३/विशि-३, दिनांक ८ मे, २०२० प्रमाणे ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येतील.

५) अंतिम सत्राचे विद्यार्थी वगळून ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा न घेता, निकाल जाहिर करावयाचे आहेत, त्यासाठी पात्र विद्यार्थी (सर्व नियमित विद्यार्थ्यांसाठी) —
   अ) दोन वर्षीय अभ्यासक्रमात सत्र-२,
   तीन वर्षीय अभ्यासक्रमात सत्र-२ व ४,
   चार वर्षीय अभ्यासक्रमात सत्र-२, ४ व ६
   पाच वर्षीय अभ्यासक्रमात सत्र-२, ४, ६ व ८

या सत्रांच्या या विद्यार्थ्यांच्या परीक्षानघेता, ५० टक्के अंतर्गतगुण व ५० टक्के पूर्व परीक्षेचे गुण देवून विद्यापीठाद्वारे परीक्षेचा निकाल तयार करण्यात येईल.

ब) जसे दोन वर्षीय अभ्यासक्रमात सत्र दोनचा निकाल पहिल्या सत्रांच्या गुणांची टक्केवारी व सत्र-२ च्या अंतर्गत गुणांची टक्केवारी जसे - सत्र-१ मध्ये विद्यार्थ्याला ५० टक्के गुण असतील, व सत्र-२ चे अंतर्गत गुण हे ९० टक्के असतील अशा विद्यार्थ्यांना ९० + ५० = १४०, १४०/२ ७० टक्केगुण हे अंतर्गत व बाह्य परीक्षेच्या लेखी विषयामध्ये विभागून देण्यात येईल.

क) तीन वर्षीय अभ्यासक्रमात सत्र-२ व ४ चा निकाल,

चार वर्षीय अभ्यासक्रमात सत्र-२, ४ व ६ चा निकाल, व

पाच वर्षीय अभ्यासक्रमात सत्र-२, ४, ६ व ८ चा परीक्षेचा निकाल उपरोक्त ५(ब) प्रमाणे करतेवेळी फक्त लगतच्या अगोदरच्या एकाच सत्राचे ५० टक्के गुणांच्या आधारावर व ज्या सत्राचा निकाल तयार करावयाचा आहे, त्या सत्राच्या ५० टक्के अंतर्गत गुणांच्या आधारावर तयार करण्यात येईल.

६) परिच्छेद ५ प्रमाणे ज्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर करण्यात येणार आहेत. त्या विद्यार्थ्यांच्या अगोदरच्या सत्राच्या बॅकलॉगच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा होणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा पुढे चार महिन्यांच्या कालावधीत त्यांना उन्हाळी-२०२० परीक्षेमध्ये भरलेल्या परीक्षा आवेदनपत्राच्या आधारावर घेण्यात येईल, व ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत अशा अगोदरच्या सत्राची परीक्षा आवेदनपत्रे भरली नाहीत, अशा विद्यार्थ्यांना सुद्धा परीक्षा आवेदनपत्र भरण्याची संधी परीक्षेच्या दोन महिने अगोदर देण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा डिसेंबर-२०२० मध्ये घेण्यात येईल.

७) परिच्छेद ५ प्रमाणे ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात येईल. त्यानंतर श्रेणी सुधारण्यासाठी पुन्हा परीक्षा द्यावयाची असेल, अशा विद्यार्थ्यांना हिवाळी-२०२० मध्ये परीक्षा आवेदनपत्रे भरुन परीक्षेची संधी देण्यात येईल.

८) पी.एचडी. व एम.फिल. च्या विद्यार्थ्यांच्या, लॉकडाऊनमुळे राहिलेल्या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासन पत्र क्रमांक संकिर्ण २०२०/प्र.क्र.१२३/विशि-३, दिनांक ८ मे, २०२० प्रमाणे मुदतवाढ देण्यात येईल, व ऑनलाईनद्वारे व्हायव्हा-व्होसेस घेण्याची तयारी करण्यात येईल.

९) परीक्षेचे व नविन शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रकखालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| शैक्षणिक उपक्रमांच्या पूर्वतयारीचाकालावधी | ३० जूनपर्यंत, २०२० |
| पदवीपूर्व व पदव्यूत्तर अंतिम परीक्षा वगळून इतर परीक्षांच्यागुणपत्रिकाविद्यापीठाला सादरकरण्याचीतारीख | ३० जून, २०२० पर्यंत |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्यूत्तर अंतिम परीक्षा वगळून इतर सर्व परीक्षांचेनिकाल जाहीर करण्याचीतारीख | १५ जुलै, २०२० पर्यंत |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्यूत्तर अंतिम परीक्षा व त्यांच्याइतर अनुशेष परीक्षांच्यातारखा | ०१ जुलै, ते ३१ जुलै, २०२० |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्यूत्तर अंतिम परीक्षांचेतसेचत्या अनुशेष परीक्षांचेनिकाल | १५ ऑगष्ट, २०२० पर्यंत |
| **शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१**<br>अ) पदविका, पदवीपूर्व व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांचे प्रथम वर्ष वगळून सर्व अभ्यासक्रमांचे वर्ग<br>ब) प्रथम वर्ष-पदविका, पदवीपूर्व व पदव्यूत्तर | अ) ०१ ऑगष्ट, २०२० पासून<br>ब) ०१ सप्टेंबर, २०२० पासून |

१०) उन्हाळी-२०२० करीताविविध अभ्यासक्रमातील, विविध सत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे सादर केलेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्र भरण्याकरीता विद्यापीठाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

११) उन्हाळी सुटी (Vacation) बाबतचानिर्णय स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात येईल.

१२) उपरोक्त सर्व नमूद बाबी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी आहेत. या सर्व बाबीं सक्षम प्राधिकारीणीसमोर ठेवून घेतलेल्या प्राधिकारीणीच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल, उपरोक्त बाबीमध्ये झालेले बदल आपणांस सूचित करण्यात येईल.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संतगाडगे बाबा अमरावतीविद्यापीठ.

--------

क्रमांक संगाबाअवि/३/संपमुमं/१७०/२०२०,
दिनांक ११ मे, २०२०

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उपरोक्त माहिती सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना व सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांना माहिती होण्याहेतू प्रकाशित करण्याकरीता आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संतगाडगे बाबा अमरावतीविद्यापीठ.